# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.05.2025** **वार-गुरुवार**

---

**रोबोटिक्स**

भारतात रोबोटिक सैनिक विकसित व्हावा अशी अपेक्षा संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात DRDOचे माजी अध्यक्ष डॉ. जी. सतीश रेड्डी यांनी आज पुण्यात व्यक्त केली. संशोधन आणि विकास संस्था अर्थात R&DE आणि COEP तंत्रज्ञान विद्यापीठानं संयुक्तपणे रोबोटिक्स या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचं आयोजन केलं होतं; या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. R&DE पुणेचे संचालक मकरंद जोशी, DIATचे कुलगुरू डॉ नारायण मूर्ती, COEP चे कुलगुरू सुनील भिरूड, ARDE चे संचालक अंकती राजू आदी यावेळी उपस्थित होते. केंद्र सरकारने कृत्रिम बुद्धिमत्ता, डीपटेक, क्वांटम तंत्रज्ञानासाठी हाती घेतलेल्या मोहिमांप्रमाणेच प्रगत रोबोटिक्स मिशन सुरू करावं अशी सूचना डॉ. रेड्डी यांनी केली. संरक्षणासाठी वापरले जाणारे हे तंत्रज्ञान इतर उपयोगांसाठीही मोठ्या प्रमाणावर लाभदायक ठरू शकते आणि देशाच्या आर्थिक विकासात मोठा वाटा ठरू शकेल, असं मत त्यांनी व्यक्त केलं. रोबोटिक्स ही एक बहुविषयक शाखा असून तिला संगणकशास्त्र, अभियांत्रिकी, मानवशास्त्र आणि अन्य तंत्रज्ञानांच्या एकत्रित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचं रेड्डी म्हणाले.

**बुद्धपौर्णिमा**

तथागत गौतम बुद्ध यांची जयंती म्हणजेच बुध्द पौर्णिमेनिमित्त पुण्यातील विश्वभुषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने शहरात धम्म पहाट आणि धम्म संध्या कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. समितीचे अध्यक्ष परशुराम वाडेकर यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. येत्या सोमवारी पहाटे पाच वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात बुद्ध-धम्म गीतांची मंगलमय पहाट रंगणार आहे. राष्ट्रीय कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज वाबळे माऊली यांचं प्रबोधनात्मक कीर्तन होणार आहे.

**जयगणेश**

जय गणेश व्यासपीठाच्या माध्यमातून गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी ‘बाप्पाचा कार्यकर्ता. रक्तदाता उपक्रम’ हे विधायक कार्य हाती घेतलं आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून पुण्यातील एकवीस गणपती मंडळांचे कार्यकर्ते थॅलेस्मियाग्रस्त मुलांसाठी दर महिन्याला रक्तदान करणार आहेत. जागतिक थॅलेसेमिया दिनाचं औचित्य साधून आज ससून रुग्णालयात या उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. पियूष शहा आणि स्वप्नील दळवी या उपक्रमाचं नियोजन करणार आहेत.

**टेट**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरती करण्यासाठी शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी म्हणजेच टेट 2025 चं  आयोजन करण्यात येत आहे. या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठीची मुदत 14 मे पर्यंत वाढवण्यात आली आहे. टेटचे ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी 10 मे पर्यंत मुदत देण्यात आली होती. ही मुदत आता वाढविण्यात आलेली आहे. 5 मे 2025 पूर्वी अर्ज भरलेल्या उमेदवारांना सुधारित तरतूदीचा लाभ घ्यायचा असेल तर त्यांना पुन्हा ऑनलाइन अर्ज भरावे लागतील.

**पुरस्कार**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचं औचित्य साधून शरद क्रीडा आणि सांस्कृतिक प्रतिष्ठाननं राष्ट्रीय स्तरावरील मराठी काव्य स्पर्धा घेतली होती; या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला आहे. प्रसिद्ध अभिनेते प्रवीण तरडे यांनी या निकालाची घोषणा केली. या स्पर्धेत सहाशेपेक्षा जास्त कवींनी भाग घेतला असल्याची माहिती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मीकांत खाबिया यांनी दिली.

**प्रदर्शन**

पुण्यातील हौशी छायाचित्रकारांच्या ‘प्रतिबिंब’ या छायाचित्रांचं प्रदर्शन बालगंधर्व कला दालनात भरवण्यात आलं असून त्याचं उद्घाटन आज प्रसिद्ध पक्षी छायाचित्रकार डॉ. सुधीर हसमनीस आणि क्रिकेट विश्लेषक-समालोचक सुनंदन लेले यांच्या हस्ते झालं. अमर अतितकर, अमेय वाळवेकर, ओंकार मुळगुंद, केदार दंडगे, विलास तोळसंकर, समीर अय्यर, विश्वेश बेहरे, अनंतप्रसाद देशपांडे, अमोद फडके आणि सागर मुथा यांची व्यन्यजीव, पक्षी, निसर्ग आणि ग्रामीण जनजीवन या विषयांवरील अनोखी छायाचित्र या प्रदर्शनात आहेत. येत्या 10 मे पर्यंत सकाळी 10 ते रात्री 8 या वेळात हे प्रदर्शंन सर्वांसाठी खुलं आहे.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ होतं, आज कमाल तापमान 33 अंश सेल्सिअस तर किमान तापमान 22 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही ढगाळ हवामान आणि हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**